
अमेलियाचे अद्भुत घर

लेखिका: लिंडा जेकोब अल्टमॅन

चित्रे: एनरिक सांचेझ

मराठी अनुवाद: तृप्ती कर्णिक




अमेलियाचे अद्भुत घर



लेखिका: लिंडा जेकोब अल्टमॅन


चित्रे: एनरिक सांचेझ

मराठी अनुवाद: तृप्ती कर्णिक



अमेलिया लुईसा मार्टिनेजला रस्त्यांचा प्रचंड राग यायचा. सरळ, वळणदार, कच्चे, पक्के रस्ते...अनोळखी जागी घेऊन जाणारे रस्ते..खरंतर कुठलाही आनंद नाही अशा ठिकाणी घेऊन जाणरे रस्ते. जेव्हा जेव्हा तिचे बाबा नव्या ठिकाणी जाण्याचा प्रवास ठरवायचे तेव्हा तेव्हा ती रडून गोंधळ घालायची.

तिला माहित होतं की हे रस्ते कायम शेतांमध्ये पोचतात. जिथे भर उन्हात काम करावं लागतं आणि राहायला घाणेरडी खुराड्यासारखी घर असतात. लास कमिनोज (*स्पॅनिश शब्द*) म्हणजे दूरवरचा रटाळ प्रवास. हे रस्ते आपल्या आवडत्या जागी कधीच कसे जात नाही.



अमेलिया अशा जागी जायचं होतं जिथे अति कष्ट नसतील, सारखं एका जागेवरून दुसरीकडे प्रवास करावा लागणार नाही आणि राहायला घाणेरडी घर नसतील.

तिला वाटायचं की आपलं स्वत:चं एक स्वच्छ आणि नीटनेटकं घर असावं, त्या घराच्या खिडकीला निळे पडदे असतील आणि अंगणात सावली देणारं डेरेदार झाड असेल. जिथे आयुष्यभर राहता येईल आणि लास कमिनोजचा विचारसुद्धा मनात येणार नाही.


त्यांची गंजलेली जुनी गाडी लेबर कॅम्पमधल्या बारा नंबरच्या खोलीसमोर थांबली. अंधार पडू लागला होता.


"मागच्या वर्षी आपण राहिलो होतो हीच ना ती खोली?" अमेलियाने विचारालं पण कुणीही तिच्याकडे लक्ष दिलं नाही. इतर कुटुंबियांना तिच्या ह्या प्रश्नाशी काहीएक देणं घेणं नव्हतं.

अमेलियाला वाईट वाटलं. आपण इथे राहिलो, इथल्या शाळेत गेलो, इथल्या शेतात काम केलं ह्याची आठवण करून देणारी इथे एकही गोष्ट कशी नाही. आपण एका ठिकाणी कायम राहावं असं अमेलियाला खूप वाटायचं.

"नक्की येईल असा एक ना एक दिवस," आई म्हणायची पण तो सुंदर दिवस आजपर्यंत उजाडला नाही.








“आई," अमेलियाने विचारलं, “माझा जन्म कुठे झाला होता?"

मिसेस मार्टिनेज थोडा विचार करत म्हणाल्या, “कुठे बरं? आठवूदे बघू मला जरा..बहुदा युबा शहरात. कारण त्यावेळी मी जर्दाळू तोडत होते.”

“बरोबर, जर्दाळूच,” मि. मार्टिनेज म्हणाले, “म्हणजे तुझा जन्म जून महिन्यात झाला.”

अमेलियाने एक दीर्घ श्वास घेतला. बाकीच्या आई-बाबांना कसं तारीख, वार सगळं आठवत असतं. आपले आईबाबा मात्र त्या त्यावेळच्या पिकांच्या हंगामानुसार लक्षात ठेवतात. मि. मार्टिनेजना त्यांच्या आयुष्यातल्या सगळ्या महत्वाच्या घडामोडी कुठल्या न कुठल्या पिकांच्या हंगामानुसारच लक्षात होत्या.





दुसऱ्या दिवशी सगळे पहाटे लवकर उठले. पहाटे पाचपासून ते सकाळच्या आठपर्यंत अमेलिया आणि तिच्या घरचे सगळे सफरचंद तोडत होते. खरंतर अमेलियाला खूप झोप येत होती पण फळं खाली पडू नये म्हणून काळजीपूर्वक तोडावी लागत होती.

एकदाची सकाळची काम संपली. अमेलियाच्या हाताची आग आग होऊ लागली. खांदे भरून आले. तिने एक सफरचंद घेतलं आणि शाळेसाठी धाव ठोकली.

मागच्या वर्षी फिलमोर प्राथमिक शाळेत अमेलिया सहा आठवडे गेली पण तरीदेखील तिच्या शिक्षिकेला तिचं नावही माहित नव्हतं.

ह्यावर्षीच्या शिक्षिकेला मात्र सर्व मुलांची नावं लक्षात होतं. नवीन आलेल्या सर्व मुलांचं बाईंनी स्वागत केलं आणि आपापल्या नावाचा बिल्ला लावायला दिला. बाईंनीही स्वत:च्या नावाच्या बिल्ला ड्रेसला लावला होता. त्यावर मिसेस रामोस असं लिहिलं होतं.

मिसेस रामोसनी मुलांना त्यांची जी खास इच्छा आहे त्याचं चित्रं काढायला सांगितलं. "तुम्हाला जे खूप खास, हवंच आहे ती गोष्ट आम्हाला सगळ्यांना दाखवाल का?"

अमेलियाला आपल्याला काय हवंय हे पक्कं ठाऊक होतं. तिने पांढरंशुभ्र सुंदर घर, घरासमोर अंगण, अंगणात मोठं झाड असं चित्र काढलं. अमेलियाचं चित्र पूर्ण झाल्यावर मिसेस रामोसनी ते वर्गातल्या सगळ्या मुलांना दाखवलं. आणि नंतर चित्राच्या वर त्यानी चमचमणारी लाल चांदणी चिकटवली.


त्यादिवशी शाळा सुटेपर्यंत आख्या वर्गाच्या तोंडावर अमेलियाचं नाव होतं. जिथे कायमचं राहावं अशी जागा एकदाची तिला सापडली.





अमेलिया तर ढगातच होती. कधी एकदा घरी पोचते आणि आईला आजच्या दिवसाबद्दल सांगते असं तिला होऊन गेलं होतं. कॅम्पमध्ये लवकर पोचण्यासाठी तिने शॉर्टकटच्या रस्ता शोधून पकडायचा ठरवलं. आणि त्यावेळी नेमका तिला तो मिळालाही...

एक अद्‌भुत रस्ता..




अमेलियाने त्याचं नाव अद्‌भुत रस्ता असं ठेवलं कारण तो छोटासा खडबडीत रंगीबेरंगी रस्ता होता. रस्ता कसला खरं तर ती पायवाट होती.

आता रस्ता हिरवागार झाला. आजूबाजूला गोल झुडुपं होती. हिरवे गवत तुडवत ती छोट्याशा टेकडीवरून खाली उतरली. तो रस्ता जिथे संपला तिकडे एक अतिशय सुंदर असं भलंमोठं झाड होतं. इतका जुना, भक्कम आणि डेरेदार वृक्ष अमेलियाने पहिल्यांदाच बघितला. तिने डोळे मिटले. त्या झाडासमोर आपल्याला हव्या असलेल्या पांढऱ्याशुभ्र घराचे चित्र तिला स्पष्ट दिसू लागले.

अमेलिया आनंदाने नाचू लागली, कुरणावर गिरक्या घेऊ लागली, तिचे काळे तलम केस वाऱ्यावर भुरभुरू लागले.








आता रोजच काम आणि शाळा संपली की अमेलिया ह्या झाडाखाली येऊन बसू लागली आणि आपल्या घरी आलो आहोत अशी कल्पना करायची.

जगाच्या पाठीवर मला हवी असलेली हीच ती जागा. हेच ते माझं घर.



पण इथली शेतातील कामं जवळजवळ संपत आली होती. इथून जाताना आपण काय करायचं? अमेलियाला काही कळत नव्हतं.


आपले आईबाबा, बहिण रोझा, भाऊ व्हिक्टर, कॅम्पमधील सगळे शेजारी, शाळेतील टीचर मिसेस रामोस अशा सगळ्याना तिने विचारलं पण कुणीही तिच्या प्रश्नाचं उत्तर देऊ शकलं नाही. आणि अचानक तिला एक अद्‌भुत कल्पना सुचली .


अमेलियाला कचऱ्याच्या डब्यात फेकलेला एक टीनची छोटी पेटी मिळाली. पेटी थोडी गंजली होती आणि पत्रा कुठेकुठे ठोकलेला होता पण तिनं त्याकडे लक्ष दिलं नाही. कारण जाताना काय करायचं ह्याचं उत्तर त्या पेटीमुळे मिळालं होतं.

अमेलियाच्या गोष्टीने ती पेटी भरायची असं तिने ठरवलं. सर्वात आधी तिने मागच्या एका ख्रिसमसला तिला आईने भेट दिलेली लाल रिबीन त्यात ठेवली. नंतर मिसेस रामोसनी दिलेला तिच्या नावाचा बिल्ला ठेवला. मागच्या वर्षीच्या वाढदिवसाच्या निम्मिताने सर्व कुटुंबियाचा एकत्र काढलेला फोटो ठेवला आणि त्यानंतर शाळेत काढलेले लाल चांदणी चिकटवलेले घराचे चित्र त्यात ठेवले.

आणि सगळ्यात शेवटी तिने एक पेपर घेतला. त्यावर तिला सापडलेल्या अद्‌भुत रस्त्याचा मुख्य रस्त्यापासून ते त्या विशाल झाडापर्यंतचा नकाशा काढला. त्यावर आपल्या सुंदर हस्ताक्षरात “अमेलिया पथ” लिहिलं. नकाशाची गुंडाळी केली आणि पेटीत ठवली.







सगळी सफरचंद तोडून झाल्यावर अमेलियाचे आईबाबा आणि इतर कामगार तिथून निघण्याच्या तयारीला लागले. अमेलिया पळत पुन्हा त्या लाडक्या झाडाजवळ गेली. ह्यावेळी बरोबर तिचा खजिना असलेली टीनची पेटी होती.

तिने एक छोटा खड्डा खणला. त्यात हळुवार ती पेटी ठेवली आणि त्यावर माती सारून झाकून टाकले. कुणाला कळू नये म्हणून नंतर त्यावर एक मोठा दगड ठेवला.


सगळं झाल्यावर अमेलिया चार पाऊलं मागे चालली. मागे वळून त्या झाडाकडे डोळे भरून पाहिलं. तिची स्वत:ची जागा, जिथे तिला जेव्हा हवं तेव्हा येता येणार होतं.



“मी नक्की परत येईन,” ती पुटपुटली आणि तिथून पळत निघाली.

तिने हिरव्या कुरुणावर उद्या मारल्या, आकाशाकडे पाहून हसली, अगदी त्या अद्भुत रस्त्याच्या मधोमध उलटसुलट उड्याही मारल्या.





जेव्हा ती कॅम्पमधे परत आली तेव्हा घरचे गाडीमधे सामान भरत होते. अमेलियाने त्यांच्याकडे एक नजर टाकली, लांब श्वास घेतला आणि त्यांना मदत करायला पळाली.

वडिलांनी पुढच्या ठिकाणाचा नकाशा काढला तेव्हा आयुष्यात पहिल्यांदा ती अजिबात रडली नाही.

लेखकाचे मनोगत

अमेलिया लुईसा मार्टिनेज, तिचे कुटुंबीय आणि त्यांच्यासारखी हजारो कुटुंबे ज्यांना स्थलांतरित शेतमजुर म्हणून ओळखले जाते, ते शेतीच्या हंगामानुसार कामासाठी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी प्रवासी करतात. त्यांना स्वतःचे हक्काचे घर नसते. मेक्सिको, दक्षिण अमेरिका, करेबियन अशा जगातल्या अनेक भागातून काही कामगार प्रवास करून येतात. पण बरेचसे स्थलांतरित कामगार अमेरिकेतच जन्मलेले म्हणजे अमेरिकन नागरिकही असतात.

काही ठिकाणी फक्त घरातील पुरुष हंगामात शेतीच्या कामासाठी जातात आणि कामे संपली की ते आपले कुटुंब जिकडे असेल तिकडे परत येतात. तर काही आपल्या कुटुंबियांनाही सोबत घेऊन कामावर जातात. गरज असेल तर मुलांनाही शेतात कामे करावी लागतात.

सततचे काम आणि स्थलांतर ह्यामधे लहान मुले भरडली जातात. त्यांना एका ठिकाणची धड ओळख होत नाही किंवा त्यांना मित्र मिळत नाही. ह्या गोष्टीत अशीच एक मुलगी कशी तिच्या आवडीची जागा शोधते हे सांगण्याचा प्रयत्न केला आहे.